# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH
Internet : www.dte.org.in


क्रमांक : १६/आस्था/२०११/४२
दिनांक : १२।९।२०११

प्रति,

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

विषय : शासकीय तंत्रनिकेतने व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये येथे कर्मशाळेत कार्यरत असणाऱ्या तांत्रिक कर्मचारी वर्गाच्या पदनाम बदल व सुधारीत वेतन संरचना मागणीबाबत.

उपरोक्त विषयाबाबतचे संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय तंत्रनिकेतने व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील कर्मशाळेत कार्यरत असणाऱ्या तांत्रिक कर्मचाऱ्यांचे पदनामात बदल तथा सदर पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या, सुधारीत सेवाप्रवेश नियम व सुधारीत वेतनश्रेणी मिळणेबाबतचा प्रस्तावाबाबत कार्यवाही होईपर्यंत दिनांक ०१.०८.२०११ पासून नियमानुसार काम आंदोलन सुरु केले आहे.

संघटनेने सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, आपल्या अधिपत्याखालील कार्यरत संस्थेचे प्राचार्य व कर्मशाळा अधिक्षक यांची बैठक घेऊन संघटनेने सादर केलेल्या प्रस्तावाची छाननी करुन, महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखालील इतर विभाग व इतर राज्यामधील याबाबत प्रचलित सेवा प्रवेश नियम, कर्तव्ये जबाबदाऱ्या, वेतन संरचना यांचा विचार करुन सखोल छाननी करुन आपले अभिप्राय तात्काळ या संचालनालयास सादर करावेत.

( सु. का. महाजन )
प्र. संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

---

जा.क्र.विकापु/आस्था-1/बैठक/2011/6639

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
पुणे 411016
दिनांक : 14 SEP 2011

प्रति--सर्व शासकीय तंत्रशास्त्र, औषधनिर्माण व तत्सम पदवी / पदविका संस्थांना संचालनालयाचे उपरोक्त संदर्भाधीन पत्र माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी. कर्मशाळेत कार्यरत असणा-या तांत्रिक कर्मचारी वर्गाच्या पदनाम बदल व सुधारीत वेतन संरचना मागणीबाबत केलेल्या संघटनेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सेवा प्रवेश नियम, कर्तव्य जबाबदा-या आणि वेतन संरचना याबाबत विचार करुन छाननी करण्यासाठी संस्थेच्या प्राचार्य आणि कर्मशाळा अधिक्षक यांनी दि.17.9.2011 रोजी सकाळी 11.30 वाजता तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे येथे आयोजित केलेल्या बैठकीस उपस्थित राहावे.

प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत श्री.भिलावे, प्रोग्रामर यांना संदर्भाधिन पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.